**प्रेस नोट दि. १०.०६.२०२६ ला.प्र.वि.सांगली युनिट**

**आरोपी लोकसेवक श्री. प्रविण रंगराव बाबर, वय-३१ वर्षे, पद- कर निर्धारण प्रशासकीय अधिकारी जत नगरपरीषद यांनी तक्रारदार यांचेकडे तडजोडीअंती ५०,०००/- रूपये लाचेची मागणी करून सापळा कारवाईमध्ये ५०,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारली असता पकडलेबाबत. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली विभागाची कारवाई.:**

| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **सांगली** |
|---|---|
| **पोलीस स्टेशन** | जत पोलीस ठाणे, जि.सांगली |
| **गुन्हा नोंद क्रमांक व कलम** | गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरू आहे. |
| **तक्रारदार** | पुरुष वय ५१ वर्षे |
| **आरोपी लोकसेवकाचे नांव व कार्यालय** | श्री. प्रविण रंगराव बाबर, वय-३१ वर्षे, पद- कर निर्धारण प्रशासकीय अधिकारी जत नगरपरीषद रा.श्री इथापे यांचे घरी भाडयाने, भोसले अपार्टमेंट, ३ रा. मजला बालविदयामंदीराचे पाठीमागील बाजुस, जत मुळ रा.मु.पो.कामेरी ता.वाळवा जि.सांगली |
| **पडताळणी कारवाई वेळी मागणी केलेली लाचेची रक्कम व दिनांक** | दि.१०.०६.२०२६ रोजी ७५,०००/- रु ची मागणी करुन तडजोडीअंती ५०,०००/- रूपये लाचेची मागणी |
| **सापळा कारवाई वेळी स्विकारलेली लाचेची रक्कम** | ५०,०००/- (पन्नास हजार रूपये त्यामध्ये ३०,०००/- रु चलनी नोटा व २०,०००/- रु डमी नोटा) |
| **सापळा कारवाई दिनांक व ठिकाण** | दि.१०.०६.२०२६ रोजी ५०,०००/- रूपये लाचेची रक्कम जत नगरपरीषदेखालील असलेल्या यशोदा फोटो स्टुडीओमध्ये |
| **थोडक्यात हकीकत** | यातील तक्रारदार यांचा फोटोग्राफीचा व्यवसाय असुन सन २०२५ मधील जत नगरपरीषद सार्वत्रिक निवडणुकीचे प्रक्रियेकरीता फोटो व व्हिडीओ शुटींगचे कामाचे टेंडर त्यांना मिळालेले होते. सदर कामाचे बिल श्री प्रविण रंगराव बाबर कर निर्धारण प्रशासकीय अधिकारी जत नगरपरीषद यांनी मंजुर करुन घेवुन पुढे लेखा शाखेकडे पाठविलेले होते व तेथुन तक्रारदार यांना ३,४१,९२२/- रुपयांचा चेक अदा करणेत आलेला होता. सदर अदा करुन दिलेल्या बिलाचा मोबदला मिळणेकरीता आरोपी लोकसेवक श्री प्रविण रंगराव बाबर कर निर्धारण प्रशासकीय अधिकारी जत नगरपरीषद यांनी तक्रारदार यांचेकडे ७५,०००/- रूपये लाचेची मागणी केले बाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दिनांक १०/०६/२०२६ रोजी सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दिला होता.<br>तक्रारदार यांच्या तक्रारीनुसार दि. १०/०६/२०२६ रोजी पडताळणी कारवाई केली असता आरोपी लोकसेवक श्री प्रविण रंगराव बाबर वय – ३२ वर्षे, कर निर्धारण प्रशासकीय अधिकारी जत नगरपरीषद यांनी तक्रारदार यांचे सन २०२५ मधील जत नगरपरीषद सार्वत्रिक निवडणुकीचे प्रक्रियेकरीता फोटो व व्हिडीओ शुटींगचे कामाचे मंजुर करुन दिलेल्या बिलाचा मोबदला म्हणुन तक्रारदार यांचेकडे ७५,०००/- रु ची मागणी करुन तडजोडीअंती ५०,०००/- रु लाच मागणी करुन आजरोजी लागलीच ५०,०००/- रूपये स्विकारण्याची संमती दर्शविली.<br>त्यानंतर लागलीच करण्यात आलेल्या सापळा कारवाईमध्ये श्री प्रविण रंगराव बाबर वय – ३२ वर्षे, कर निर्धारण प्रशासकीय अधिकारी जत नगरपरीषद यांनी जत नगरपरीषदेखालील असलेल्या यशोदा फोटो स्टुडीओमध्ये तक्रारदार यांचेकडून ५०,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.<br>त्या अनुषंगाने आरोपी लोकसेवक श्री. प्रविण रंगराव बाबर, वय-३२ वर्षे, पद- कर निर्धारण प्रशासकीय अधिकारी जत नगरपरीषद राहणार श्री इथापे यांचे घरी भाडयाने, भोसले अपार्टमेंट, तिसरा मजला ,बालविदयामंदिराचे पाठीमागील बाजुस,जत मुळ रा.कामेरी ता.वाळवा जि.सांगली यांचेविरूध्द जत पोलीस ठाणे येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे. |
| **तपास अधिकारी** | श्री. योगेश चव्हाण, पोलीस निरीक्षक, ला. प्र. वि. सांगली |
| **मार्गदर्शन अधिकारी** | पोलीस उप-आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे,<br>अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.<br>श्रीमती यास्मीन इनामदार, पोलीस उप अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली, |
| **सापळा पथक** | श्रीमती यास्मीन इनामदार, पोलीस उप-अधीक्षक, पोलीस निरीक्षक, श्री. योगेश चव्हाण, तसेच पोलीस अंमलदार प्रितम चौगुले, सागर नायकुडे, अजित पाटील, पोपट पाटील, उमेश जाधव, ऋषिकेश बडणीकर, मनोज निळकंठ, रामहरी वाघमोडे, धनंजय खाडे, सुदर्शन पाटील, चंद्रकांत जाधव, प्रकाश जाधव, राजेश मुदगल, महेश शेंडगे, विना जाधव, चालक विठ्ठलसिंग राजपूत |

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप-अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४, व्हॉट्स अॅप व मोबाईल नंबर ९४०४०४१०६४ वर संपर्क साधावा.

यास्मीन इनामदार
पोलीस उप अधीक्षक
लाप्रवि सांगली

Scanned with OKEN Scanner